# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट क्र-१५२** **दिनांक - १९/०४/२०२४**

## मौल्यवान दागिने, रोख रक्कम असा १,०५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमालाचा शोध घेऊन तक्रारदार यांना परत करण्यात पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक १७/०४/२०२४ रोजी दुपारी ०२.०० वा. च्या सुमारास महिला श्रीमती. नाजली अंन्जुम अबुसाद अंन्सारी वय २४ वर्षे, रा. नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर हया नालासोपारा रेल्वे स्टेशन येथुन धानिवबाग नालासोपारा पुर्व येथे एक पॅसेन्जर रिक्षात बसुन आल्या असता त्या त्यांची बँग रिक्षामध्येच विसरल्याचे त्या घरी गेल्यानंतर त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी पेल्हार पोलीस ठाण्यात येऊन त्या त्यांची ०१ तोळा वजनाची सोन्याची चैन, ०२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कानातील झुमके, तसेच ५,०००/- रुपये रोख रक्कम असा एकुण १,०५,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल बँग मध्ये रिक्षात विसरलेबाबत पेल्हार पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

सदर तक्रारीचे गांभीर्य लक्षात घेऊन सदर तक्रारी मधील अनोळखी रिक्षा व त्यावरील चालकाचा शोध घेणेबाबत पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांना सुचना देऊन आदेशित केले होते.

सदर आदेशान्वये गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी अंमलदार यांनी घटनास्थळाचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता एक रिक्षा मधुन तक्रारदार महिला उतरतांना दिसत होती. सदर रिक्षाचा सीसीटीव्ही फुटेजच्या अनुषंगाने शोध घेतला असता सदर रिक्षा हि नालासोपारा रेल्वे स्टेशन ते सोपाराफाटा अशी प्रवाश वाहतुक करत असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने सदर रिक्षाचा शोध घेतला असता सदरची रिक्षा हि एम एच ४८ एएक्स ४२४१ हि असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर रिक्षाचे चालकाकडे सदरबाबत विचारणा केली असता त्याने सदर महिलेची मौल्यवान वस्तु असलेली बँग पोलीसांना दिली असुन पोलीसांनी सदर बँग व त्यामध्ये असलेल्या मौल्यवान वस्तु तक्रारदार महिला श्रीमती. नाजली अंन्जुम अबुसाद अंन्सारी वय २४ वर्षे, यांना परत दिल्या आहे.

सदरची कामगिरी श्री. जयंत बजबळे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ ३, विरार, श्री. बजरंग देसाई, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (गुन्हे), शकील शेख, पोलीस निरीक्षक (प्रशासन), पेल्हार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/सोपान पाटील, पोउपनिरी/तुकाराम भोपळे, पोहवा/योगेश देशमुख, तानाजी चव्हाण, अनिल शेगर, वाल्मिक पाटील, पो.अं./रवि वानखेडे, किरण आव्हाड, मिथुन मोहिते, निखील मंडलिक, संजय मासाळ, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, शरद राठोड, सुजय पाटील, सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


PREMIER